महायुती 235 | मविआ 50 | इतर 03

| वर्ष - 8 | अंक -136 | UDYAM-MH-26-0158827 |

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com

रविवार, दिनांक 24 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com











# महायुतीची 'त्सुनामी'!

## महाविकास आघाडीचा सुपडा साफ

# विधानसभा निवडणुकीत 'भगवे वादळ'

## महाराष्ट्रात हिंदूंची वज्रमूठ अन् लाडक्या बहिणीचा मोठा आशिर्वाद!

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 चे सर्व निकाल स्पष्ट झाले आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिलं आहे. तर दुसऱ्या बाजूला मविआचा दारुण पराभव झाला आहे. महायुतीने 220 पेक्षा अधिक जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार येणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. सोमवारी 25 नोव्हेंबरला मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये नव्या सरकारचा शपथविधी पार पडणार आहे.**

लोकसभा निवडणुकीत हिंदू मतांचे विभाजन झाले. त्यामुळे महाविकास आघाडी आणि काँग्रेसला मोठा फायदा झाला होता. त्यानंतर भाजपा महायुतीने हिंदू मतांचे विभाजन होवू नये. या करिता रणनिती आखली.

राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवण्यात आली. तसेच, 'व्होट जिहाद विरुद्ध भगवा जिहाद' ही घोषणा केली.

### शिंदेंच्या शिवसेनेने जिंकल्या 57 जागा



राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. तर, महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मोठी मुसंडी मारली आहे. त्यांच्या पक्षाने राज्यात ५७ जागा जिंकल्या आहेत. एकनाथ शिंदे यांचा पक्षाला महायुतीच्या जागावाटपात ८५ जागा मिळाल्या होत्या. त्यापैकी ५७ जागांवर शिंदेंचे शिलेदार जिंकले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी दावा केला होता की त्यांच्याबरोबर बंड करणाऱ्या सर्व आमदारांना पुन्हा निवडून आणणार. एकनाथ शिंदे यांनी त्यांचा शब्द राखला आहे. त्यांच्याबरोबर गेलेले जवळपास सर्वच आमदार (सदा सरवणकर वगळता) विजयी झाले आहेत.

### शरद पवारांचे किती शिलेदार जिंकले...



राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला महाविकास आघाडीमध्ये २८८ पैकी ८६ मतदारसंघ मिळाले होते. काही मतदारसंघात शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. तर ४० मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना पाहायला मिळाला. शरद पवार यांनी स्वतः प्रचारात उतरून वातावरण निर्मिती केली. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने अजित पवार गट आणि महायुतीला लक्ष्य केले. मात्र प्रत्यक्ष निकालात शरद पवारा गटाला फारसे यश मिळालेले नाही. ८६ पैकी केवळ १० जागांवर शरद पवार गटाच्या उमेदवारांचा विजय झाला आहे. तर ७६ ठिकाणी त्यांचे उमेदवार पराभूत झाले.

### राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार विजयी उमेदवार



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला महायुतीमध्ये २८८ पैकी ५१ जागा मिळाल्या होत्या. यापैकी ४० मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा थेट सामना पाहायला मिळाला. महायुतीमध्ये सर्वात कमी जागा अजित पवार यांना मिळाल्या होत्या. तरीही त्यांनी आतापर्यंत ४० जागांवर विजय मिळविला आहे. तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला केवळ १५ जागा मिळाल्या आहेत. शरद पवार गटाने ८६ जागांवर निवडणूक लढविली होती.

### दादांच्या रणनीतीला कमालीचं यश, गुलाबी रंग निरखून निघाला

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव होणार, त्यांच्या १०-१५ जागाच येतील, स्वतः अजित पवार हे बारामतीतून पडू शकतात, जिंकलेच तर अत्यंत कमी मताधिक्याने जिंकतील, बारामतीचा अंदाज शरद पवार यांच्याइतका कुणालाच येत नाही, असे सगळे आडाखे बारामती आणि राज्यातील जनतेने पार मातीमोल ठरवले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने जवळपास ८० टक्क्यांच्या आसपासचा 'स्ट्राइक रेट' राखला. त्यांच्या ४०च्या वर जागा संध्याकाळापर्यंत येत असल्याचे निश्चित झाले आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत सन्नाटा पसरला, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ल्यायलेला गुलाबी रंग अधिकच निरखून निघाला. भारतीय जनता पक्षासोबत जाऊनही, 'ही राजकीय तडजोड आहे, वैचारिक नाही. आम्ही अजूनही फुले-शाहू-आंबेडकर यांची विचारधारा सोडलेली नाही. 'बटेंगे तो कटेंगे' हा भाजपचा नारा आम्हाला मान्य नाही', असे अजित पवार यांनी ठामपणे सांगितले. ही भूमिका ते आवश्यक त्या व्यासपीठांवर सातत्याने मांडत राहिले.

# पुण्यात अजित पवारच 'दादा'!

## पश्चिम महाराष्ट्र : बालेकिल्ल्यात काँग्रेस भुईसपाट, 70 जागांपैकी 56वर महायुती

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एके काळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आणि पुरोगामी विचारांना साथ देणारा म्हणून ओळखला जाणारा पश्चिम महाराष्ट्राचा टापू महायुतीने या निवडणुकीत अक्षरशः काबीज केला आहे. हिंदुत्वाचा मुद्दा येथे चालल्याचे दिसले. महाविकास आघाडीतील काही दिग्गजांचा पराभव आणि केवळ दोन जागांपुरती उरलेली काँग्रेस ही दोन पश्चिम महाराष्ट्राच्या निकालांची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली.?**



जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांपैकी पुणे शहरावर भाजपचे वर्चस्व असल्याचे, तर ग्रामीण भागावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्राबल्य असल्याचे निवडणूक निकालावरून स्पष्ट झाले. काँग्रेस जिल्ह्यातून हद्दपार झाली असून, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला अवघी एक जागा मिळाल्याने नामुष्की पत्करावी लागली आहे. शिवसेना (ठाकरे) आणि शिवसेना (शिंदे) या पक्षांनी प्रत्येकी एक जागा घेऊन अस्तित्व टिकविले आहे. मनसेला मात्र मतदारांनी साफ नाकारले.

जिल्ह्यातील २१ मतदारसंघांमध्ये भाजपने नऊ जागा जिंकून ताकद दाखवून दिली आहे. त्यामध्ये पुणे शहरात सहा, पिंपरी-चिंचवडमध्ये दोन आणि जिल्ह्यात एक जागा मिळविली आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने सहा ठिकाणी जिल्ह्यात, एक पुण्यात आणि एक पिंपरी-चिंचवड शहरात अशा आठ जागा जिंकून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यावरील 'दादागिरी' दाखवून दिली. खेड-आळंदी आणि जुन्नरमधील जागा मात्र या पक्षाला गमवाव्या लागल्या. या जागा अनुक्रमे शिवसेना (ठाकरे) आणि अपक्षाला मिळाल्या. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला वडगाव शेरी या एकाच जागेवर समाधान मानावे लागले आहे. शिवसेना (ठाकरे) आणि शिवसेना (शिंदे) या पक्षाला एक जागा मिळाली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपकडे आठ, काँग्रेसकडे तीन होत्या. 'राष्ट्रवादी'कडे असलेल्या दहापैकी नऊ आमदार अजित पवार यांच्याकडे, तर एक शरद पवार यांच्याकडे गेला.

### शरद पवारांचा प्रभाव कमी

प. महाराष्ट्रातील हे चारही जिल्हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मानणारे आहेत. पक्षफुटीनंतर त्यांनी या चारही जिल्ह्यांत मोठे आव्हान निर्माण केले होते. मात्र, सोलापूर वगळता त्यांच्या पक्षाला फारसा प्रभाव दाखवता आला नाही. सोलापुरात मात्र चार जागा जिंकून पवारांनी आपला दबदबा आजही कायम असल्याचे दाखवून दिले. इतर जिल्ह्यांत मात्र शरद पवार यांना प्रभाव दाखविता आला नाही.

### विखेंमुळे महायुतीनगर!

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, गेल्या आठ निवडणुकांत सलगपणे विजय मिळवणारे बाळासाहेब थोरात यांच्यासह खासदार नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांना बसलेला पराभवाचा धक्का हे अहिल्यानगर जिल्ह्यातील निकालाचे वैशिष्ट्य ठरले. जिल्ह्यात महायुतीला मिळालेले यश पाहता, राधाकृष्ण विखे यांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले. एका अर्थाने विखे यांचा तिहेरी विजय समजला जातो. ते स्वतः तर विजयी झालेच, शिवाय त्यांचे कट्टर परंपरागत विरोधक बाळासाहेब थोरात व सहा महिन्यांपूर्वीच लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखे यांचा पराभव करून विजय मिळवणारे नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांचा पारनेरमधून झालेला पराभव, असा तिहेरी विजय विखे यांना लाभल्याचे मानले जाते. सुजय विखे यांच्या पराभवासाठी थोरात यांनी नगर लोकसभा निवडणुकीत जीवाचे रान केले होते. नीलेश लंके यांना सर्व प्रकारची मदत केली होती. पण, थोरात यांचा पराभव घडवून आणून विखे यांनी वचपा काढल्याचे मानले जाते.

---

## जिल्ह्यातील ३०३ उमेदवारांना ४७ हजार मतदारांनी नाकारले

## चिंचवड मतदारसंघातून सर्वाधिक चार हजार 316 मतदारांची नोटाला पसंदी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरासह जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघामधून ३०३ उमेदवारांनी निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल आजमावला. मात्र, ४७ हजार ६८५ मतदारांनी सर्वच उमेदवारांना नाकारले असल्याचे मतमोजणीमध्ये स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, वडगाव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या पराभवाची मते 'नोटा'इतकी असल्याचे दिसून आले आहे.**




पुणे शहरात आठ, पिंपरी चिंचवडमध्ये तीन आणि उर्वरीत ग्रामीण भागात दहा असे एकूण २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून महायुती, महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांसोबत वंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहूजन समाज पक्ष आणि इतर प्रादेशिक, स्थानिक पक्ष आणि अपक्ष असे ३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

चिंचवड मतदारसंघातून सर्वाधिक २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, त्याच मतदारसंघात सर्वाधिक चार हजार ३१६ मतदारांनी 'वरीलपैकी कोणीही नाही' (नोटा) पर्याय निवडला आहे. त्यापाठोपाठ शहरातील वडगाव शेरी मतदारसंघात सर्वाधिक चार हजार २३७ मतदारांनी नोटा पर्याय निवडला आहे. या मतदारसंघातील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे टिंगरे अवघ्या चार हजार ७१० मतांनी पराभूत झाले आहे. तिसऱ्या क्रमांकावर कोथरूड मतदारसंघातून तीन हजार मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे मतमोजणीनंतर समोर आले आहे. कोथरूडमधून राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगरमधून भाजपचे विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्यासह १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगर मतदारसंघातून दोन हजार मतदरांनी एकही उमेदवार पसंत नसल्याने 'नोटा'ला मतदान केले आहे. ग्रामीण भागातील जुन्नर विधानसभा मतदारसंघात १३७६ मतदारांनी 'नोटा' पर्यायावर विश्वास दाखविला. आंबेगाव ११५७, खेड-आळंदी १६९२, शिरूर २१५७, दौंड १२११, इंदापूर ६३४, बारामती ७७९, पुरंदर १४८४, भोर २७२० आणि मावळ विधानसभा मतदारसंघात २७१५ मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### मतदारसंघातील 'नोटा'ला झालेले मतदान

जुन्नर – १३७६, आंबेगाव – ११५७, खेड आळंदी – १६९२, शिरूर – २१५७, दौंड – १२११इंदापूर – ६३४, बारामती – ७७९, पुरंदर – १४८४, भोर -२७२०, मावळ – २७१५, चिंचवड – ४३१६, पिंपरी – ४०१३, भोसरी – २६८५, वडगाव शेरी – ४२३७, शिवाजीनगर – २०४४, कोथरूड – ३१५२, खडकवासला – २९००, पर्वती – २४६१, हडपसर – २९४६, पुणे कॅन्टोन्मेंट – १७९३, कसबा – १२१३

# चिंचवडमधून शंकर जगताप विक्रमी मतांनी विजयी!

## मावळ निवडणुक एकतर्फी, शेळके 1 लाख मताधिक्याने विजयी

। चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचे शंकर जगताप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. चिंचवड च्या जनतेने शंकर जगताप यांना १ लाख ३ हजार आणि मावळ च्या जनतेने आमदार सुनील शेळके यांना १ लाख ८ हजार मताधिक्याने विजयी केले आहे. मावळ विधानसभा मतदारसंघ हा लक्षवेधी ठरला.**



मावळ विधानसभा निवडणुक एकतर्फी झाल्याचे पाहायला मिळालं. चिंचवड विधानसभा मतदार संघाची ही परिस्थिती काही वेगळी नाही. चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये भाजपचे शंकर जगताप विरुद्ध शरद पवार गटाचे राहुल कलाटे अशी थेट लढत होती. राहुल कलाटे यांच्यासाठी खासदार अमोल कोल्हे यांनी कंबर कसली. मित्र राहुल कलाटे यांच्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला होता. त्याचबरोबर शरद पवार यांचा रोड -शो देखील घेण्यात आला होता. तरीदेखील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी राहुल कलाटे यांना नाकारत भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना विजयी केलं.एक लाख तीन हजारांचे मताधिक्य मिळवून दिलं. दुसरीकडे मावळ विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सुनील शेळके यांच्या पुढे त्यांच्याच पक्षातील बंडखोर बापू भेगडे यांच आव्हान होतं. भेगडे यांना भाजपमधून माजी राज्यमंत्री बाळ भेगडे यांनी पाठिंबा दिला होता. मावळ मधील अवघी भाजप शेळके यांच्या विरोधात होती. असं असताना सुनील शेळके यांनी बाजी मारली. मावळ मधील जनतेने सुनील शेळके यांना एक लाख आठ हजारांच्या मताधिक्याने विजयी केल आहे. मावळ मधील लक्षवेधी ठरलेल्या या विधानसभेच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष होतं. एकूणच चिंचवड आणि मावळ मधील दोन्ही महायुतीच्या उमेदवारांनी लाखांचा पल्लागाठत विजयश्री खेचून आणली आहे.मावळ विधानसभा निवडणुक एकतर्फी झाल्याचे पाहायला मिळालं. चिंचवड विधानसभा मतदार संघाची ही परिस्थिती काही वेगळी नाही.चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये भाजपचे शंकर जगताप विरुद्ध शरद पवार गटाचे

राहुल कलाटे अशी थेट लढत होती. राहुल कलाटे यांच्यासाठी खासदार अमोल कोल्हे यांनी कंबर कसली. मित्र राहुल कलाटे यांच्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला होता. त्याचबरोबर शरद पवार यांचा रोड -शो देखील घेण्यात आला होता. तरीदेखील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी राहुल कलाटे यांना नाकारत भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना विजयी केलं.एक लाख तीन हजारांचे मताधिक्य मिळवून दिलं. दुसरीकडे मावळ विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सुनील शेळके यांच्या पुढे त्यांच्याच पक्षातील बंडखोर बापू भेगडे यांच आव्हान होतं. भेगडे यांना भाजपमधून माजी राज्यमंत्री बाळ भेगडे यांनी पाठिंबा दिला होता. मावळ मधील अवघी भाजप शेळके यांच्या विरोधात होती. असं असताना सुनील शेळके यांनी बाजी मारली.

### पिंपरी विधानसभा: अजित पवार मंत्रीपद देतील

पिंपरी विधानसभा मतदारसंघातून आमदार अण्णा बनसोडे विजयी झाले आहेत. अजित पवार मंत्री पदासाठी माझा नक्की विचार करतील. पिंपरी विधानसभा मतदारसंघात मंत्रिपद मिळेल. असा विश्वास अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केली आहे. अण्णा बनसोडे हे विजयी झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अण्णा बनसोडे म्हणाले, अजित पवार आणि महायुतीच्या नेत्यांचे मी आभार मानतो. माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी मला उमेदवारी दिली. विश्वास सार्थ ठरवत मी विजयी झालो आहे. हा विजय जनतेचा आणि एकजुतीचा आहे. पुढे ते म्हणाले, पिंपरी विधानसभा मतदारसंघामध्ये तुतरीच माझ्यासमोर आव्हान नव्हतं. परंतु, तस चित्र निर्माण केलं गेलं. पुढे ते म्हणाले, राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अस चित्र भासवल गेलं. महाराष्ट्रात महायुतीचे एकतर्फी विजय झाला आहे. माझा देखील एकतर्फी विजय झाला आहे. मंत्री पदासाठी माझा विचार अजितदादा करतील असा विश्वास आहे. अजित पवारांनी व्यक्त केला आहे.

# विजयी उमेदवारांना निवडणूक प्रमाणपत्र सुपूर्द

## आमदार महेश लांडगे, अण्णा बनसोडे, शंकर जगताप यांना देण्यात आले प्रमाणपत्र

। पिंपरी-चिंचवड
।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार महेश लांडगे यांना निवडणूक निरीक्षक श्री. वीणा हूडा यांच्या उपस्थितीत भोसरी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांच्या हस्ते निवडणूक प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले.**



भोसरी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ११ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीची मतमोजणी बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे मतमोजणी कक्षात सुरळीत पार पडली. या निवडणुकीमध्ये महेश (दादा) लांडगे विजयी झाले. त्याबद्दल त्यांना बालेवाडी स्टेडियम येथील मतमोजणी कक्षात निवडणूक प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी भोसरी विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सतिश थेटे, रविंद्र रांजणे, मतमोजणी आराखडा व स्ट्रॉंग रूम व्यवस्थापन समन्वय अधिकारी श्री राजेंद्र काकडे, ईव्हीएम व्यवस्थापन समन्वय अधिकारी श्री वायकर, मनुष्यबळ व्यवस्थापन श्री. निलेश खोसे, टपाली मतदान समन्वय अधिकारी श्री. राजेश आगळे, एनकोर व्यवस्थापक श्रीमती सविता दातिर, कायदा व सुव्यवस्था व पोलीस

### शंकर जगताप यांना निवडणूक प्रमाणपत्र

चिंचवड विधानसभा सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार शंकर पांडुरंग जगताप यांना निवडणूक निरीक्षक श्री. मनवेश सिंग सिद्धू यांच्या उपस्थितीत चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या हस्ते निवडणूक प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.चिंचवड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत २१ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीची मतमोजणी थेरगाव येथील स्व. शंकर (अण्णा) गावडे स्मृती कामगार भवन येथे मतमोजणी कक्षात सुरळीत पार पडली. या निवडणुकीमध्ये शंकर जगताप विजयी झाले. त्याबद्दल त्यांना थेरगाव येथील मतमोजणी कक्षात निवडणूक प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, आशा होळकर, किशोर ननवरे, मतमोजणी आराखडा व स्ट्रॉंग रूम व्यवस्थापन समन्वय अधिकारी शिरीष पोरेडी, ईव्हीएम व्यवस्थापन समन्वय अधिकारी बापूसाहेब गायकवाड, मनुष्यबळ व्यवस्थापन किरण कुमार मोरे, सेक्टर ऑफिसर समन्वयक अजिंक्य येळे, समन्वय अधिकारी उमेश ढाकणे, टपाली मतदान समन्वय अधिकारी अमित पंडित, निवडणूक सहाय्यक श्वेता आल्हाट, नीलिमा थेऊरकर आदी उपस्थित होते.

# ‘लाडकी बहीण’ला अडथळा कोणाचा?



## भूमिका

**‘लाडकी बहीण’ सारख्या योजना जाहीर करून निवडणुका जिंकणे हे योग्य की अयोग्य याची तात्त्विक चर्चा होऊ शकते आणि तो होत राहावीसुद्धा; पण महाराष्ट्राच्या या निवडणुकीत ‘महाविकास आघाडी’ने आपली रणनीती आखताना एकंदर भारतातील दारिद्र्य गांभीर्याने लक्षात घेतले नाही. भारतातील जवळपास साठ टक्के कुटुंबे महिना २० हजार रुपयांपेक्षा कमी मासिक मिळकत कमावणारी आहेत.**



या कुटुंबांसाठी महिन्याला १५०० रुपये हा मोठा आकडा आहे. आणि हे सर्व पैसे त्यांना मिळायला सुरवात झाली. निवडणुकांपर्यंत जवळपास ७५०० रुपये या कुटुंबांकडे जाणार, हेही अगदी स्पष्ट झालेले होते. हे लक्षात घेऊनदेखील मविआला आपली रणनीती आखता आली नाही.‘लाडकी बहीण योजना’ ही योजना जाहीर झाल्यावर ‘ही निवडणुकीसाठी दिली गेलेली लाच आहे. कारण तसे नसते तर गेल्या तीन वर्षांत सत्ताधारी युतीने हा कार्यक्रम का नाही जाहीर केला?’ असा आक्रमक सवाल करणे केवळ पुरेसे नव्हते. आपली ३००० रुपयांची ‘महालक्ष्मी योजना’ लगेच जाहीर करणे आणि त्याचा सातत्याने प्रचार करणे हे मविआने केले नाही. ही योजना त्यांनी खूप उशीरा- निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर, प्रचारकाळातच जाहीर केली. आणि त्याबद्दलही सातत्याने बोलणे टाळले. त्यातल्या त्यात फक्त राहुल गांधी आणि काँग्रेस बोलत राहिले. शिवसेनेने हा मुद्दा काहीसा ओझरता मांडला; पण तो आपल्या ईतर योजनांसोबतचा एक मुद्दा म्हणून. आपल्यासमोर लाडकी बहीण मधून पैसे पोहोचताना दिसत असून देखील ‘मविआ’ला ३००० रुपयांची योजना सातत्याने आणि आक्रमकपणे आश्वासकपणे मांडावेसे का वाटले नसेल? शरद पवारांसारख्या अत्यंत मुत्सद्दी चाणाक्ष राजकारण्याला हे का समजले नसेल?यात शरद पवारांची तात्त्विक भूमिका आडवी आली असावी असे वाटते. शरद पवार अशा कल्याणकारी योजनांबद्दल कधीच उत्साही नसतात. पवार केंद्रात कृषीमंत्री असताना ‘यूपीए’ सरकारने आणलेली अशी कल्याणकारी योजना म्हणजे अन्न सुरक्षा कायदा. या कायद्याच्या व्याप्तीला शरद पवारांनी सातत्याने विरोध केला. त्यांची रोजगार हमी योजनेबद्दलची भूमिका देखील पूर्वीसारखी समर्थनाची राहिलेली नाही. आणि याउलट नरेंद्र मोदींनी या दोन्ही योजनांची खिल्ली उडवल्यानंतरही त्या चालू ठेवल्या, इतकेच नाही तर अन्नसुरक्षा कायद्यात धान्यासाठी जी नाममात्र किंमत ठेवली होती तीदेखील काढून टाकून धान्य मोफत द्यायला सुरवात केली. अन्य योजनांवर ‘रेवडी’ म्हणून मोदींनी टीका केली तरी भाजपची सत्ता असलेल्या अनेक राज्यांत नवनवीन ‘रेवडी’ योजनाच राबवल्या गेल्या. शरद पवारांच्या याबाबतच्या तात्त्विक भूमिकेबद्दल आदर बाळगूनदेखील एक प्रश्न शिल्लक राहातोच की आपल्या राजकीय अस्तित्वाचा सवाल असतानादेखील पवारांनी आपल्या भूमिकेत लवचिकता का नाही दाखवली? खरे तर उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील सरकार जेव्हा सत्तेवर होते तेव्हाच अशी योजना सुरू करावी असे शरद पवारांसारख्या अनुभवी नेत्याला का वाटले नसावे? हे गूढ राहील.‘लाडक्या बहिणी’च्या या विजयानंतर यापुढे रोख रक्कम देण्याच्या योजनांना यापुढे गती मिळणार हे नक्की. केंद्रातील भाजप सरकारला अशा योजना आणि मुस्लिम विरोध या दोन राजकीय हत्यारांच्या साहाय्याने यापुढील निवडणुकांमध्ये आपण हमखास यश मिळवू असा आत्मविश्वास असणे स्वाभाविक आहे. ‘सर्व भारतीय नागरिकांमध्ये समान प्रतिष्ठा असते’ यासारखी मूल्ये बाळगणाऱ्यांसाठी या निवडणुका धक्कादायक होत्या. निवडणुकांचे निकाल नाही तर दिल्या गेलेल्या ‘कटेंगे तो बटेंगे’सारख्या अभद्र घोषणा अधिक धक्कादायक ठरतात. सर्व हिंदूनी आमच्या पक्षाला मते दिली नाहीत तर त्यांचे खरे नाही अशा प्रकारची आवाहने महाराष्ट्रात कधी मतदारांना भिडतील असे वाटले नव्हते मोदी सरकारच्या दशकपूर्तीनंतर ही अशी आवाहने मतदारांना साद घालू लागली आहेत. ज्या नेत्यांनी कधीही जातीयवादी (कम्युनल) घोषणा दिल्या नव्हत्या त्यांनी देखील व्होट जिहाद, धर्मयुद्ध अशी भाषा वापरली. ज्या राज्याला शाहू फुले आंबेडकरांच्या विचारांचा – समान व्यक्ति प्रतिष्ठेच्या मूल्याचा वारसा आहे, त्या राज्यात अशा घोषणा दिल्या जाव्यात.

## प्रासंगिक »

### अडाणी आणि अदानी!

***कोणत्या व्यवहारासाठी किती आणि कोणास ‘दिले’ याचा साद्यांत तपशील या ५४ पानी ‘आरोपपत्रा’त असल्याने अदानींना निर्दोषत्व सिद्ध करावे लागेल...***

भारतीय उद्योगमहर्षी गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेमध्ये ठपका ठेवण्यात आल्यानंतर गेल्या २४ तासांत उमटलेल्या प्रतिक्रिया आपल्या देशातील व्यापक अडाणीपणाची साक्ष देतात. अमेरिकी व्यवस्था चालते कशी, हे प्रकरण काय, कारवाई काय इत्यादी कशाचाही गंध नसलेले वाचाळवीर ‘दोन महिने थांबा, एकदा का डोनाल्डदादा ट्रम्प अध्यक्ष झाले की एका फोनमध्ये प्रकरण शांत होईल’, अशा प्रकारची विधाने करताना दिसतात. या विधानांमुळे उलट अदानी यांच्यावर आणि त्यापेक्षाही अधिक भारतीय व्यवस्था-शून्यतेवर ठेवला जाणारा ठपका किती योग्य आहे हेच सिद्ध होते याचेहीतेव्हा त्यांचा समाचार घेणे आवश्यक. त्यानंतर हे प्रकरण नक्की काय, याचा ऊहापोह. सदर प्रकरण हे आपल्याकडील कुडमुड्या भांडवलशाहीत जे जे काही अमंगल आणि अभद्र त्याचे प्रतीक असल्याने त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आजच्या घडीला आपल्या भारतात वयाने ज्येष्ठ असलेले कसोटी क्रिकेटपटू म्हणून मुंबई – निवासी डॉ. चंद्रकांत त्रिंबक पाटणकर अर्थात चंदू पाटणकर यांचेच नाव डोळ्यांसमोर येते ! रविवार २४ नोव्हेंबर २०२४ रोजी ते वयाची ९४ वर्षे पूर्ण करून ९५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यानिमित्त मी आणि माझा मित्र किशोर देसाई यांनी त्यांची भेट घेतली.

## कसोटी खेळणाऱ्याला प्रतिदिन 50 रुपये मिळत



चंदू पाटणकर हे १९५५ साली भारताचे यष्टिरक्षक म्हणून कलकत्त्याच्या ईडन गार्डन स्टेडियमवर न्यूझीलंड विरुद्धचा चौथा कसोटी सामना खेळले होते, त्या वेळी त्यांनी न्यूझीलंडच्या गॉर्डन लेगाट आणि बर्ट सटक्लिफ् या दोन्ही सलामीच्या फलंदाजांचे झेल यष्टीमागे लीलया पकडून त्यांना बाद केले होते. तसेच टोनी मॅकगिबन् या मातब्बर फलंदाजाला यष्टिचीत केले होते. त्याच सामन्यात ते भारतातर्फे आठव्या क्रमांकावर फलंदाजी करायला मैदानात उतरले होते तेव्हा भारताची धावसंख्या ७ बाद ८८ इतकी शोचनीय होती. अश्याही परिस्थितीत चंदू पाटणकर यांनी जे. एम. घोरपडे यांना उत्तम साथ देत अर्धशतकाची भागीदारी केली आणि स्वतः १३ धावा काढल्या. दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना त्यांनी अवघी एकच धाव काढलेली असताना भारताने डाव घोषित केल्याने ते नाबाद राहिले. दुसऱ्या डावात यष्टिरक्षक म्हणून खेळत असताना त्यांनी न्यूझीलंडचा फलंदाज जॅक अलबस्टर याचा यष्टीमागे झेल घेतला. एकंदरीत त्यांची कामगिरी समाधानकारकच झाली. मात्र तरीही चंदू पाटणकर यांच्या नावाचा विचार कसोटी सामन्यांसाठी पुढे कधी केला गेलाच नाही. नरेन ताह्मणे आणि नाना जोशी यांनाच भारताचे यष्टिरक्षक म्हणून पुढे अनेक वर्षे संधी मिळत गेली आणि चंदू पाटणकर यांची कसोटी कारकीर्द, कलकत्यातल्या त्या एकमेव कसोटी सामन्यानंतर समाप्तच झाली. प्रथम दर्जाच्या २६ सामन्यात त्यांनी ३८ फलंदाजांना यष्टीमागे क्षेत्ररक्षण करताना बाद केले होते आणि स्वतः फलंदाजी करत असताना पाचशेहून अधिक धावा रचल्या होत्या.चंदू पाटणकर यांची दृष्टी आणि स्मृती याही वयात उत्तम आहे. ते आजही दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहत असतात. क्रिकेटविषयक मराठी – इंग्रजी पुस्तके वाचत असतात. मी २००४ साली भारत – पाकिस्तान एकदिवसीय क्रिकेट सामने पाहण्यासाठी पाकिस्तानला गेलो होतो. त्यासंदर्भातील माझे पुस्तक दोनदा वाचल्याचे त्यांनी सांगितले. क्रिकेटपटू संदीप पाटील याने त्यांना भेट दिलेल्या ‘बियॉण्ड द बाउंडरीज्’ या आत्मचरित्राची प्रत त्यांनी आम्हाला दाखवली. त्यांनी त्यांचे एक विशेष आवडते पेन मला दिले. हे पेन सुनील गावस्कर यांनी त्यांना सप्रेम भेट दिले होते. गप्पांच्या ओघात भारताच्या पहिल्या पाकिस्तान दौऱ्याचा विषय निघाला. हा दौरा डिसेंबर १९५४ ते मार्च १९५५ या दरम्यानचा होता. त्या दौऱ्यासाठी यष्टिरक्षक म्हणून भारतीय संघात आपली निवड होईल असा बहुधा त्यांचा कयास होता. परंतु भारताच्या संघात यष्टिरक्षक म्हणून नरेन्द्र ताम्हणे यांची प्रथमच निवड झाली. आपली ती संधी हुकली याची सल चंदू पाटणकर यांना आजही वाटत असल्यास नवल वाटायला नको.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नव्या सरकारचं नेतृत्व कोण करणार?

## वानखेडे स्टेडियमवर 25 तारखेला शपथविधीचा मुहूर्त

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट झालेल्या लढाईत कोण बाजी मारणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. मतदानानंतर समोर आलेल्या एक्झिट पोल्समधून जाहीर झालेले अंदाज पाहून महायुती व मविआमध्ये अटीतटीची लढत होईल असं दिसत होतं. काही एक्झिट पोल्समधून त्रिशंकू स्थितीचा अंदाज वर्तवण्यात आला होता. तीन चाचण्यांनी अंदाज वर्तवला होता की राज्यात मविआला बहुमत मिळेल.**



मात्र, सर्व राजकीय विश्लेषक, मतदानोत्तर चाचण्या चुकीच्या ठरवत महायुतीने तब्बल २३६ जागांवर आघाडी मिळवली आहे. रात्री १० वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार २८८ पैकी २३६ जागांवर महायुती आघाडीवर आहे. तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर आघाडी मिळाली आहे. महायुतीमध्ये भाजपाला १३३, शिवसेनेला (शिंदे) ५७, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (अजित पवार) ४१ जागा मिळाल्या आहेत. तर, महाविकास आघाडीत शिवसेनेला (ठाकरे) २०, काँग्रेसला १६ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (शरद पवार) १० जागा जिंकल्या आहेत.राज्यातील जनतेने स्पष्ट बहुमत दिल्यानंतर आता महायुतीकडून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरपर्यंतच आहे. तत्पूर्वी नवं सरकार स्थापन करणं अपेक्षित आहे. २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन झालं नाही तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते.त्यामुळे महायुती २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करेल. भारतीय जनता पार्टी राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असून राज्यपाल या पक्षाला सत्तास्थापनेसाठी आमंत्रित करू शकतात. दरम्यान, अनेक वृत्तवाहिन्यांनी सूत्रांच्या हवाल्याने बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत की मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर नव्या सरकारचा शपथविधी होईल.भाजपाने तब्बल १३५ हून अधिक जागा जिंकल्यामुळे भाजपा नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुढील पाच वर्षांसाठी राज्याचं नेतृत्व करू शकतात. मात्र देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे की आमच्या महायुतीतील सर्व पक्षांचे नेते एकत्र बसून मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय घेतील.दरम्यान, या शपथविधीनंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, “महाराष्ट्रातील जनतेने, तसेच विदर्भासह नागपूरच्या जनतेने आम्हाला प्रचंड आशीर्वाद दिला आहे. तसेच जे लोक सांगत होते की विदर्भात आमचं पानिपत होईल, आमचं विदर्भात किंवा नागपुरात पानिपत होईल त्यांचंच विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात पानिपत झालं आहे. राज्याच्या जनतेने आम्हाला आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे मी राज्याच्या जनतेसह नागपूर व विदर्भाच्या जनतेचे, माझ्या कर्मभूमीचे आभार मानतो. यावेळी त्यांना विचारण्यात आलं की भाजपाला १३७ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आता भाजपाचा, नागपूरचा मुख्यमंत्री होणार का? यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले,“आमच्या तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून चर्चा करतील आणि मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील. हा निकाल खरोखरंच अविश्वसनीय, अभूतपूर्व असा निकाल आहे. ईश्वर व जनता जेव्हा आपल्याला काहीतरी देते तेव्हा भरभरून देते. जनतेने आम्हाला छप्परफाड मतदान केलं आहे”.सर्व राजकीय विश्लेषक, मतदानोत्तर चाचण्या चुकीच्या ठरवत महायुतीने तब्बल २३६ जागांवर आघाडी मिळवली आहे. रात्री १० वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार २८८ पैकी २३६ जागांवर महायुती आघाडीवर आहे. तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर आघाडी मिळाली आहे. महायुतीमध्ये भाजपाला १३३, शिवसेनेला (शिंदे) ५७, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (अजित पवार) ४१ जागा मिळाल्या आहेत. तर, महाविकास आघाडीत शिवसेनेला (ठाकरे) २०, काँग्रेसला १६ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (शरद पवार) १० जागा जिंकल्या आहेत.राज्यातील जनतेने स्पष्ट बहुमत दिल्यानंतर आता महायुतीकडून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरपर्यंतच आहे. तत्पूर्वी नवं सरकार स्थापन करणं अपेक्षित आहे.राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते. त्यामुळे महायुती २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करेल. भारतीय जनता पार्टी राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असून राज्यपाल या पक्षाला सत्तास्थापनेसाठी आमंत्रित करू शकतात.

### संपूर्ण महाराष्ट्रात पानिपत झालं

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर नव्या सरकारचा शपथविधी होईल.भाजपाने तब्बल १३५ हून अधिक जागा जिंकल्यामुळे भाजपा नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुढील पाच वर्षांसाठी राज्याचं नेतृत्व करू शकतात. मात्र देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे की आमच्या महायुतीतील सर्व पक्षांचे नेते एकत्र बसून मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय घेतील.दरम्यान, या शपथविधीनंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, “महाराष्ट्रातील जनतेने, तसेच विदर्भासह नागपूरच्या जनतेने आम्हाला प्रचंड आशीर्वाद दिला आहे. तसेच जे लोक सांगत होते की विदर्भात आमचं पानिपत होईल, आमचं विदर्भात किंवा नागपुरात पानिपत होईल त्यांचंच विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात पानिपत झालं आहे.

# महाराजांच्या महाराष्ट्राने दाखवून दिले

## विधासभेतील मोठ्या विजयानंतर मोदींची विरोधकांवर टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल आज (२३ नोव्हेंबर) रोजी जाहीर झाला. विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी थेट लढत झाल्याचे पाहायला मिळाले, ज्यामध्ये महायुतीला मोठं यश मिळालं तर महाविकास आघाडीला मोठा पराभव झाला आहे. महायुतीच्या उमेदवारांचा २३० हून अधिक जागांवर विजय मिळाला आहे.**



या दमदार विजयानंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महायुतीच्या नेत्यांचे कौतुक केले असून महाराष्ट्रातील जनतेचे देखील आभार मानले आहेत. महाराष्ट्रात सुशासनाचा विजय झाला असून घराणेशाहीचा पराभव झाल्याचे मोदी म्हणाले. भाजपाच्या दिल्लीतील मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, “आपण एका ऐतिहासिक महाविजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी जमलो आहोत. आज महाराष्ट्रात विकासवाद, सुशासन आणि सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. तर विभाजनकारी शक्ती, नकारात्मक राजकारण आणि घराणेशाहीचा पराभव झाला आहे. आज महाराष्ट्राने विकसीत भारताच्या निश्चयाला बळ दिले आहे. यासाठी मी भाजपा, एनडीएच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतो”. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्रातील महायुतीचे एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे कौतुकदेखील केले.“उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानने भाजपाला मोठा पाठिंबा दिला आहे. मध्य प्रदेश, बिहारमध्येही एनडीएला पाठिंबा मिळाला आहे. यातून दिसून येतं की देशाला फक्त आणि फक्त विकास हवा आहे”, असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

### जनतेन आशीर्वाद देत विजयी केले

तुष्टीकरणाचा सामना कसा करावा हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राने आज दाखवून दिले. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर, बाळासाहेब ठाकरे अशा महान लोकांच्या राज्याने जुने सर्व रेकॉर्ड मोडीत काढले.गेल्या ५० वर्षात कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीसाठी हा सर्वात मोठा विजय आहे”,असे पंतप्रधान मोदी म्हणाले. “आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे लागोपाठ तिसऱ्यांदा झालं आहे की, भाजपाच्या नेतृत्वाखालील युतीला सलग महाराष्ट्राच्या जनतेन आशीर्वाद देत विजयी केले आहे.भाजपा महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष ठरण्याची देखील ही तिसरी वेळ आहे.

# प्रियंका गांधींनी मोडला राहुलचा रेकॉर्ड!

## राहुल गांधी यांनी ट्विट करत जनतेचे आभार मानले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आपल्या पहिल्या निवडणुकीत विक्रमी विजय मिळवला आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त्यांनी चार लाखांहून अधिक मतांनी विजय मिळवत बंधू राहुल गांधींचा मताधिक्याचा विक्रम मोडला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी ३.६५ लाख मतांनी विजयी झाले होते. आता प्रियंका गांधी यांनी या आघाडीला मागे टाकत मोठी आघाडी मिळवलीय. वायनाड पोटनिवडणुकीत प्रियंका गांधी आणि त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्यातील मतांचा फरक लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून निवडणूक लढवलेले राहुल गांधी आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यपिक्षा जास्त होता. दरम्यान याच पार्श्वभूमीवर आता राहुल गांधी यांनी ट्विट करत वायनाडमधील जनतेचे आभार मानले आहेत.**



प्रियंका गांधी यांच्या विजयानंतर राहुल गांधी ट्विटमध्ये म्हणतात, "वायनाडमधील माझ्या कुटुंबाने प्रियंकावर विश्वास ठेवल्यामुळे मला खूप अभिमान वाटतो. मला माहित आहे की ती धैर्य, करुणा आणि अतुल समर्पणाने आपल्या प्रिय वायनाडला प्रगती आणि समृद्धीच्या शिखरावर नेईल."दरम्यान विजयानंतर प्रियंका गांधी यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. 'वायनाडच्या माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो, तुम्ही माझ्यावर जो विश्वास ठेवला त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. काळाच्या ओघात हा विजय तुमचा विजय आहे, याची तुम्हाला जाणीव होईल आणि तुम्ही तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडलेली व्यक्ती तुमच्या आशा-स्वप्ने समजून घेईल आणि तुमच्यासाठी लढेल, याची मी खात्री करून देते. संसदेत तुमचा आवाज होण्यासाठी मी उत्सुक आहे.' पुढे प्रियंका गांधी म्हणाल्या की, 'मला हा सन्मान दिल्याबद्दल आणि त्याहीपेक्षा तुम्ही मला दिलेल्या अपार प्रेमाबद्दल खूप खूप धन्यवाद. प्रियंका गांधी यांच्या विजयानंतर राहुल गांधी ट्विटमध्ये म्हणतात, "वायनाडमधील माझ्या कुटुंबाने प्रियंकावर विश्वास ठेवल्यामुळे मला खूप अभिमान वाटतो. मला माहित आहे की ती धैर्य, करुणा आणि अतुल समर्पणाने आपल्या प्रिय वायनाडला प्रगती आणि दरम्यान विजयानंतर प्रियंका गांधी यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. 'वायनाडच्या माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो, तुम्ही माझ्यावर जो विश्वास ठेवला त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. काळाच्या ओघात हा विजय तुमचा विजय आहे, याची तुम्हाला जाणीव होईल आणि तुम्ही तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडलेली व्यक्ती तुमच्या आशा-स्वप्ने समजून घेईल आणि तुमच्यासाठी लढेल, याची मी खात्री करून देते. संसदेत तुमचा आवाज होण्यासाठी मी उत्सुक आहे.' पुढे प्रियंका गांधी म्हणाल्या की, 'मला हा सन्मान दिल्याबद्दल आणि त्याहीपेक्षा तुम्ही मला दिलेल्या अपार प्रेमाबद्दल खूप खूप धन्यवाद. यूडीएफमधील माझे सहकारी, संपूर्ण केरळमधील नेते, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि माझ्या कार्यालयातील सहकारी ज्यांनी या मोहिमेत प्रचंड मेहनत घेतली, १२ तासांचा (अन्न नाही, विश्रांती नाही) गाडीचा प्रवास सहन केला आणि त्या आदर्शांसाठी खऱ्या सैनिकांप्रमाणे लढा दिला,यूडीएफमधील माझे सहकारी, संपूर्ण केरळमधील नेते, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि माझ्या कार्यालयातील सहकारी ज्यांनी या मोहिमेत प्रचंड मेहनत घेतली, आपल्या पाठिंब्यासाठी, दिवसाला १२ तासांचागाडीचा प्रवास सहन केला आणि त्या आदर्शांसाठी खऱ्या सैनिकांप्रमाणे लढा दिला, आपण सर्वजण ज्यांच्यावर विश्वास ठेवतो, त्यांचे खूप खूप आभार. तुम्ही मला जे प्रेम आणि धैर्य दिले आहे त्याबद्दल कोणतीही कृतज्ञता कधीही पुरेशी ठरणार नाही. आणि माझा भाऊ राहुल, तू त्या सर्वांमध्ये सर्वात धाडसी आहेस. मला मार्ग दाखवल्याबद्दल आणि मला नेहमीच पाठिंबा दिल्याबद्दल धन्यवाद!

### काळाच्या ओघात हा विजय तुमचा

प्रियंका गांधी यांच्या विजयानंतर राहुल गांधी ट्विटमध्ये म्हणतात, "वायनाडमधील माझ्या कुटुंबाने प्रियंकावर विश्वास ठेवल्यामुळे मला खूप अभिमान वाटतो. मला माहित आहे की ती धैर्य, करुणा आणि अतुल समर्पणाने आपल्या प्रिय वायनाडला प्रगती आणि समृद्धीच्या शिखरावर नेईल."दरम्यान विजयानंतर प्रियंका गांधी यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. 'वायनाडच्या माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो, तुम्ही माझ्यावर जो विश्वास ठेवला त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. काळाच्या ओघात हा विजय तुमचा विजय आहे, याची तुम्हाला जाणीव होईल आणि तुम्ही तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडलेली व्यक्ती तुमच्या आशा-स्वप्ने समजून घेईल आणि तुमच्यासाठी लढेल, याची मी खात्री करून देते. संसदेत तुमचा आवाज होण्यासाठी मी उत्सुक आहे.

# झारखंडमध्ये एनडीएचा दारूण पराभव!

## जेएमएम-काँग्रेस युतीने 60 जागांवर विजय मिळवला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने अटक केल्यानंतर झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन बरेच चर्चेत आले होते. ते तुरुंगवासात होते तेव्हा त्यांच्या जागी चम्पाई सोरेन यांनी मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळली. महाराष्ट्रात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालेलं असताना झारखंडमध्ये मात्र भाजपाचा दारुण पराभव झाला आहे. झारखंडचे जेएमएम पक्षाचे आजी माजी मुख्यमंत्री जिंकले असून या पक्षाला पुन्हा सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली आहे.**



सत्ता कायम ठेवण्याचा राज्याचा इतिहास जेएमएम पक्षाने मोडला आहे. जेएमएम-काँग्रेस युतीने ६० जागांवर विजय मिळवला आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी येथे ४२ जागांची आवश्यकता आहे. तर, भाजपाच्या नेतृत्वाखालील NDA ने २१ जागांवर विजय मिळवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जेएमएम-काँग्रेस-राष्ट्रीय जनता दल युतीने ४७ जागा जिंकल्या. जेएमएमने स्वबळावर ३० जागा जिंकल्या होत्या. तर, २०१४ मध्ये १९ जागा होत्या. भाजपला ८१ पैकी फक्त २५ जागा मिळवता आल्या होत्या. झारखंड विधानसभा निवडणुकीत सत्तारूढ झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखालील 'इंडिया ' आघाडीचा सामना भाजपच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत मुख्य लढत झाली. दोन संस्थांचा अपवाद वगळता बहुसंख्य मतदानोत्तर चाचण्यांनी राज्यात सत्तांतर होईल असे भाकीत वर्तवले होते.

### सत्ताविरोधी लाटेचा फटका बसेल

प्रत्येक निवडणुकीत नवं सरकार स्थापन करण्याचा या राज्याचा इतिहास आहे. मात्र, या इतिहासाची पुनर्रावृत्ती यंदा झाली नाही. कारण, पुन्हा सोरेन यांच्या जेएमएम-काँग्रेस युतीने येथे सत्ता काबिज केली आहे. मतदानोत्तर चाचण्यांची सरासरी पाहिली तर राज्यात भाजप ४५ जागा जिंकेल असा अंदाज वर्तवला होता. झारखंड मुक्ती मोर्चाला सत्ताविरोधी लाटेचा फटका बसेल असा या चाचण्यांचा अंदाज होता. राज्यातील प्रचारात भाजपाने मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना लक्ष्य केले होते.

# आतिफ अस्लमने दाखवली लेकीची पहिली झलक

बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती. आज (२३ मार्च रोजी) आतिफ त्याच्या गोंडस मुलीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे त्यानिमित्ताने आतिफने पहिल्यांदाच त्याच्या मुलीचा हलीमाचा फोटो शेअर केला आहे.आतिफ अस्लमने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. बरोबर एका वर्षानंतर आज पहिल्यांदाच त्याने हलीमाचा चेहरा जगासमोर आणला आहे. पहिल्या फोटोत बाबा आतिफ हलीमाबरोबर खेळताना दिसतोय. तर दुसऱ्या फोटोत सफेद फ्रॉकवर हलिमा एकदम गोंडस दिसत आहे. या पोस्टला आतिफने कॅप्शन देत लिहिले, “बाबाने राजकन्येचे शूज खिशात ठेवले आहेत, जेव्हा माझ्या हलीमाला तो हवा असेल तेव्हा ती सांगेल. २३/०३/२०२३- तुला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

"आतिफच्या लाडक्या लेकीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोसटवर आतिफच्या अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, “किती सुंदर आहे हलीमा, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा”. “अल्लाह तुमच्या जीवनात आनंद आणि आशीर्वाद घेऊन येवो. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा गोंडस हलीमा” असं दुसऱ्याने लिहिलं.दरम्यान, आतिफ अस्लमच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, २०१३मध्ये आतिफने साराशी लाहौरमध्ये निकाह केला होता. त्यांना अब्दुल व अर्यान ही दोन मुले आहेत आणि हलीना त्यांची तिसरी अपत्य आहे. पाकिस्तानी सिंगर असलेल्या आतिफने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं. त्याची अनेक गाणी लोकप्रिय आहेत. बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशAल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती.

## गोविंदाने पुन्हा केलं लग्न

सध्या बॉलिवूड अभिनेता गोविंदा खूप चर्चेत आला आहे. एकाबाजूला तो राजकारणात पुन्हा एन्ट्री करणार असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर त्याची भेट झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे गोविंद पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकाच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच दुसऱ्या बाजूला गोविंदाने ३७ वर्षांनंतर पुन्हा एकदा लग्न केलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा ‘डान्स दिवाने’च्या चौथ्या पर्वात उपस्थित राहिले होते. याच सेटवर ‘कलर्स टीव्ही’च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.या व्हिडीओत, माधुरी दीक्षित म्हणतेय “आमच्याकडे लग्नाचे फोटो देखील नाहीयेत.” तर माधुरी म्हणते, “फोटो नाहीत, काही हरकत नाही. ‘डान्स दिवाने’चं कुटुंब आहे.

## कंगना अडकणार लग्नबंधनात?



मागील काही महिन्यांत अनेक बॉलीवूड कलाकार आपल्या आयुष्याला नवीन सुरुवात करीत लग्नबंधनात अडकले आहेत. आधी रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी आणि आता क्रिती खरबंदा व पुलकित सम्राट यांनी लग्नगाठ बांधली. आता बॉलीवूडची क्वीन कंगना रणौतही तिच्या नवीन आयुष्याला लवकरच सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंगनाने आपल्या लग्नाचे कपडेदेखील निवडले असल्याची चर्चा सुरू आहे. ‘रेडिट’वर आलेल्या माहितीनुसार, कंगना आपल्या लग्नातील पोशाख एका ड्रेस डिझायनरकडून तयार करून घेणार आहे. कंगनाचा हा ड्रेस डिझायनर इंडस्ट्रीमधलाच आहे; पण तितकासा सुप्रसिद्ध नाही. कंगनाच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी खासगी ठेवण्यात आल्या आहेत. कंगना कोणाशी लग्न करणार आहे हे अजून जाहीर झालं नसलं तरी तिचा बॉयफ्रेंड आहे, असं तिनं आधी कबूल केलं होतं.रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात कंगनानं हजेरी लावली होती. त्यादरम्यान, कंगना आणि निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते आणि त्यामुळेच कंगना निशांतला डेट करीत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, अभिनेत्रीनं या अफवा असल्याचं स्पष्ट केलं आणि ती दुसऱ्याच कोणाला तरी डेट करतेय; परंतु तो निशांत नाही, असा खुलासा तिनं केला होता.निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करीत कंगनानं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, “माझी मीडियाला नम्र विनंती आहे की, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करीत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेनं एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्यानं रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही.”मध्यंतरी कंगना एका परदेशी व्यक्तीबरोबर हातात हात धरून चालताना दिसली होती. तेव्हा तो तिचा बॉयफ्रेंड असल्याच्या चर्चाही सुरू होत्या. कंगना स्पष्टवक्ती आहे आणि प्रत्येक गोष्ट ती सोशल मीडियावर शेअर करते. अशात तिच्या लग्नाची बातमी ती चाहत्यांपासून का लपवून ठेवेल.

## शाहरुख खान करतो कोटींची कमाई

शाहरुख खानला बॉलीवूडमधील किंग खान या नावाने ओळखले जाते. शाहरुखचं वैयक्तिक आयुष्यही एका राजासारखंच आहे. शाहरुख आपल्या अभिनयाच्या जोरावर एका चित्रपटात कोटींची कमाई करतो. अभिनय क्षेत्रात तर किंग खानचा पाय रोवला गेला आहे पण शाहरुख क्रिकेटद्वारेसुद्धा बक्कळ कमाई करतो. २०२४च्या आयपीलच्या हंगामाला सुरूवात झाली असून कालच ‘चेन्नई सुपर किंग्ज’ विरुद्ध ‘रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू’ यांचा पहिला सामना पार पडला. ‘चेन्नई सुपर किंग्ज’ने या सामन्यात बाजी मारली. तर आज ‘कोलकाता नाइट रायडर्स’ आणि ‘सनरायझर्स हैदराबाद’ यांचा सामना सुरू झाला आहे. शाहरुख खान ‘कोलकाता नाइट रायडर्स’ या टीमचा मालक आहे.

आयपीलमधून दरवर्षी शाहरुखची किती कमाई होते याबद्दल जाणून घेऊयात. प्रत्येक आयपीएल संघाला टीव्ही ब्रॉडकास्ट आणि बीसीसीआयच्या प्रायोजकत्वातून मिळणाऱ्या कमाईचा काही हिस्सा मिळतो. शाहरुख खान आयपीएलमधील ‘कोलकाता नाईट रायडर्स’ संघाचा मालक आहे. या संघाद्वारे, शाहरुख खान ब्रँड एंडोर्समेंट्स, मॅच फी, फ्रँचायझी फी, BCCI इव्हेंट रेव्हेन्यू आणि बक्षीस रकमेतून भरपूर कमाई करतो. मात्र, यातून त्यांना किती कोटींची कमाई होते, याचा खुलासा झालेला नाही.मीडिया रिपोर्ट्सनुसार, शाहरुख खान आयपीएलमधील त्याच्या टीममधून दरवर्षी २५० ते २७० कोटी रुपयांची कमाई करतो. मात्र, या सामन्यांमध्ये अंदाजे १०० कोटींचा खर्चही होतो. हा सगळा खर्च खेळाडूंच्या खरेदी आणि व्यवस्थापनावर होतो.‘कोलकाता नाईट रायडर्स’ची या संघाची कमाई १५० कोटींहून अधिक आहे.



## ‘मिस युनिव्हर्स’ मध्ये सहभागी होण्यास मनाई

उर्वशी रौतेलाने तिच्या करिअरची सुरूवात मॉडेलिंगपासून केली. २०१२ साली ‘आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया’ सौंदर्यस्पर्धेत ती जिंकली होती. परंतु ‘मिस युनिव्हर्स’ २०१२ मध्ये तिला सहभागी होता आले नाही याची खंत तिला नेहमी वाटते. २०१२ सालची ‘आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया’ स्पर्धा जिंकल्यानंतर उर्वशी रौतेलाचं पुढचं ध्येय ‘मिस युनिव्हर्स’ जिंकण्याचं होतं. परंतु, शेवटच्या क्षणी काही अडचणी आल्यामुळे तिला ते साध्य करता आलं नाही. तेव्हा भारताचे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी सुश्मिता सेन यांच्या कंपनीकडे होती.‘मिरची प्लस’ला दिलेल्या मुलाखतीत उर्वशीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली, “मी जेव्हा २०१२ मध्ये पहिल्यांदा ‘मिस युनिव्हर्स इंडिया’चा किताब जिंकले. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प आमचे बॉस होते ‘मिस युनिव्हर्स’साठी वयाची मर्यादा आहे. ‘मिस युनिव्हर्स’स मध्ये सहभाग घेण्यासाठी वय मर्यादा १८ होती. याबद्दल मला काहिचं माहित नव्हतं. मी तेव्हा १७ वर्षांची होती आणि लवकरच १८ वर्षांची होणार होती.

# यशस्वी जैस्वालचा मोठा पराक्रम!

## गंभीरला मागे टाकत कामगिरी करणारा पहिला भारतीय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील पहिला कसोटी सामना पर्थ येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने पहिल्या डावात १५० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात यजमान ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १०४ धावांत गारद झाला. त्यामुळे भारतीय संघाने ४६ धावांची आघाडी घेऊन आपल्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली. या डावात यशस्वी जैस्वालने केएल राहुलबरोबर सलामी देताना मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. पहिल्या डावात त्याला खातेही उघडता आले नव्हते.**



भारतीय डावाच्या १५० धावांच्या प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन फलंदाजांची कामगिरीही अत्यंत खराब झाली. जसप्रीत बुमराहने एकट्याने कांगारू संघाच्या टॉप ऑर्डरला खिंडार पाडली. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाचे ७ फलंदाज ६७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले होते. यानंतर दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलिया १०४ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर पहिल्या डावातील अपयशातून धडा घेत यशस्वी जैस्वालने केएल राहुलसह दुसऱ्या डावात सावध खेळी करत टीम इंडियाच्या डावाची सुरुवात केली. त्याचबरोबर १५ धावा करताच नवा इतिहास लिहिला आहे.वास्तविक यशस्वी जैस्वाल यंदा जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. तो भारताकडून कसोटीत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. या वर्षी १००० हून अधिक धावा करणारा युवा सलामीवीर जो रूटनंतर जगातील दुसरा फलंदाज आहे. जैस्वालने पर्थ कसोटीच्या दुसऱ्या डावात १५ धावांचा टप्पा गाठताच भारतीय कसोटी क्रिकेटच्या इतिहासात एक नवा चमत्कार घडला. जैस्वाल कसोटी क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक धावा करणारा डावखुरा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने १६ वर्षे जुना विक्रम मोडला. यापूर्वी हा विक्रम माजी भारतीय क्रिकेटर आणि टीम इंडियाचे विद्यमान मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या नावावर होता.

गंभीरने २००८ साली कसोटी क्रिकेटमध्ये ८ कसोटी सामन्यांच्या १६ डावात ११३४ धावा केल्या होत्या. या काळात त्याने ३ शतके आणि ६ अर्धशतके झळकावली.भारतीय संघाचा युवा फलंदाज यशस्वी जैस्वालने ऑस्ट्रेलियातील पहिल्याच कसोटी सामन्यात अर्धशतक झळकावले आहे. पहिल्या डावात स्वस्तात बाद झाल्यानंतर यशस्वीने दुसऱ्या डावात संयमाने फलंदाजी केली आणि हळूहळू डाव पुढे नेला. यासह भारतीय संघाने १५० अधिक धावांची आघाडी मिळवली आहे. या सामन्यादरम्यान यशस्वी जैस्वाल ऑस्ट्रेलियन गोलंदाज मिचेल स्टार्कला स्लेजिंग करताना दिसला पण आपल्या फलंदाजीवरही त्याने लक्ष केंद्रित केलं.

यशस्वी जैस्वालने ३८व्या षटकातील पहिल्या चेंडूवर एकेरी धाव घेत आपले अर्धशतक पूर्ण केले. जैस्वालचे यंदाचे हे १०वे अर्धशतक आहे. जैस्वालने ५० धावा करण्यासाठी १२३ चेंडू खेळला. जैस्वालच्या कारकिर्दीतील हे सर्वात संथ अर्धशतक असले तरी त्याचे महत्त्व खूप जास्त आहे. जैस्वालने आपल्या बचावात्मक फलंदाजीने ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाजांवर दबाव टाकला आणि नंतर आपल्या शानदार फटकेबाजीने संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या.

दुसऱ्या डावात जैस्वाल आणि स्टार्क यांच्यात शाब्दिक चकमक झाली एवढंच नाही तर जैस्वालने आत्मविश्वास दाखवत स्टार्कवर शब्दांचे बाण सोडले. खरं तर झालं असं की, स्टार्कच्या चेंडूला सामोरे जात असताना जैस्वालने स्टार्कला स्लेज केलं, म्हणाला, "तू माझ्याविरुद्ध खूप संथ गोलंदाजी करत आहेस." हे ऐकून स्टार्क हसायला लागतो. दोघांमधील या संवादचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.डावाच्या सुरुवातीला बचावात्मक खेळताना जैस्वालने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना खूप त्रास दिला. त्यानंतर सेट झाल्यावर निर्भयपणे खेळत त्याने स्टार्कला मिडविकेटवर चौकार मारले. सामन्यादरम्यान स्टार्क सतत बाऊन्सरने आक्रमण करत होता. तेव्हा जैस्वालने त्याला स्लेज केलं.

### यशस्वी जैस्वालचा विश्वविक्रम

पर्थ कसोटीतील पहिल्या डावात १५० धावांवर सर्वबाद होणाऱ्या भारतीय संघाच्या सलामी जोडीने दुसऱ्या डावात एकही विकेट न गमावता उत्कृष्ट १७२ धावांची खेळी केली आहे. भारताने दुसऱ्या दिवशी १०४ धावांवर ऑस्ट्रेलियाला ऑल आउट करत ४६ धावांची आघाडी मिळवली. यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना भारताने दिवसाचा खेळ संपेपर्यंत एकही विकेट न गमावता १७२ धावा केल्या आहेत आणि यासह भारताने २१८ धावांची आघाडी मिळवली आहे. केएल राहुल ६२ धावा तर यशस्वी जैस्वाल ९० धावांवर खेळत आहेत. दोघांनीही भारताकडून ऑस्ट्रेलियाविरुद्ध उत्कृष्ट १७२ धावांची भागीदारी रचली आहे. पहिल्या डावात शून्यावर बाद झाल्यानंतर यशस्वी जैस्वालने दुसऱ्या डावात शानदार पुनरागमन करत अर्धशतक झळकावलं.

# लिलावापूर्वी श्रेयस अय्यरचा मोठा धमाका

## षटकार-चौकारांचा पाऊस पाडत झळकावले वादळी शतक

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रेयस अय्यरने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये जे काही केले, त्याला योग्य वेळी मोठा धमाकी करणे म्हणतात. त्याने आयपीएल २०२५ च्या महालिलावाच्या एक दिवस अगोदर गोव्याविरुद्ध झंझावाती शतक झळकावले. या खेळीत त्याने ११ चौकार आणि १० षटकार लगावले. आयपीस २०२५ चा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. आणि त्याआधी २३ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या कर्णधाराने वादळी शतक झळकावले.**



आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी श्रेयस अय्यरच्या झंझावाती शतकाने सर्वांचे लक्ष वेधले आहे.
आयपीएलच्या गेल्या मोसमात अय्यर केकेआरचा कर्णधार होता. त्याच्या नेतृत्वाखाली केकेआरने आयपीएलच्या शेवटच्या हंगामाचे विजेतेपदही पटकावले होते. पण आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी कोलकाता फ्रँचायझीने अय्यरला कायम ठेवले नाही. आता अय्यरवर महालिलावात मोठी बोली लागण्याची शक्यता आहे. कारण आरसीबी, डीसी, केकेआर, आणि पंजाब किंग्ज संघाला कर्णधाराची गरज आहे.आयपीएल २०२५ च्या महालिलावापूर्वी अय्यरचे शतक हे कर्णधारपदासाठी ऑडिशन आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये मुंबईचे कर्णधार असलेल्या श्रेयस अय्यरने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना गोव्याविरुद्ध शतक झळकावले. त्याने ५७ चेंडूंचा सामना करताना १३० धावा केल्या. २२८.०७ च्या स्ट्राईक रेटने खेळलेल्या अय्यरच्या डावात १० षटकार आणि ११ चौकारांचा समावेश होता. मात्र या काळात त्याने केवळ ४७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.

### अय्यरने 142 धावांची खेळी केली

कर्णधार श्रेयस अय्यरच्या शानदार शतकाच्या जोरावर मुंबईने गोव्याविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ गडी गमावून २५० धावा केल्या. याआधी अय्यरने रणजी ट्रॉफीमध्ये ओडिशाविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात द्विशतक (२३३) झळकावले होते. यापूर्वी महाराष्ट्राविरुद्ध झालेल्या सामन्यात अय्यरने १४२ धावांची खेळी केली होती. अय्यरच्या सातत्यपूर्ण चमकदार खेळीमुळे तो संघात का स्थान मिळवू शकला नाही.